**MHYA150008872023**

## <u>नियमित दिवाणी मुकदमा क्रं.३१/२०२३ मधील नि.क्र.११ वरील आदेश</u>

**१.** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी ने प्रस्तुतचा अर्ज त्यांची कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी व त्यांची कैफियत स्विकारण्याकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ चे वय ७५ ते ८० वर्षांचे आहे त्यामुळे ते विद्यमान न्यायालयात हजर राहू शकत नाही तसेच मध्यंतरी दिवाळीच्या सुट्टया आल्यामुळे प्रतीवादी हे मुदतीत कैफीयत दाखल करु शकले नाही त्यामुळे प्रतीवादीला कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला उशिर माफ करुन प्रतीवादीची कैफीयत स्वीकारण्यात यावी. कैफियत स्वीकारली नाहीतर प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट वादीने प्रतिवादीच्या कथनांचा इन्कार करुन वादी यांने जाणून बुजून टाळाटाळ करीत आहेत त्यामुळे प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा, सदरचा दावा हा शेतजमीनीवरील अतिक्रमण काढुन टाकण्याकरीता दाखल केल्याचे दिसून येते. प्रस्तुत दावा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे अर्जातील कारणे व दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादीला त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

### <u>आ दे श</u>

अर्ज मंजूर करण्यात येतो प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो व त्यांची कैफीयत स्विकारण्यात येते.

स्वा/-

दि.२०/११/२०२३

(वि.सा.शिंदे)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नेर.